ePaper
भारताच्या निर्णयामुळे पाकिस्तानचे कंबरडे मोडणार?

वर्ष - 9 I अंक - 174 | UDYAM-MH-26-0158827




महाईन्यूज ™


पान 5 वरुन...
लाचखोरीच्या जाळ्यात संगमनेरमधील तिघे जेरबंद

WWW.MAHAENEWS.COM | गुरुवार, दि. 19 फेब्रुवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


## एसईबीसी आरक्षण रद्द करण्याचा सरकारचा निर्णय

# मुस्लिम समाजाचे शिक्षण व नोकऱ्यांतील ५ टक्के आरक्षण रद्द



महाईन्यूज । मुंबई

**राज्यातील मुस्लिम समाजाला देण्यात आलेले 'एसईबीसी' म्हणजे सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला वर्ग म्हणून देण्यात आलेले आरक्षण रद्द करण्याचा निर्णय मंगळवारी उशीरा राज्य सरकारने जाहीर केला. या संदर्भातील शासन निर्णय जाहीर करण्यात आहे. या संदर्भात उच्च न्यायालयाने २०१४ मध्ये या निर्णयाला स्थगिती दिली होती. त्यानंतर आता न्यायालयाच्या निकालाचा आधार घेऊन, राज्य सरकारने या संदर्भातील शासन निर्णय मंगळवारी रद्द केला. या निर्णयामुळे मुस्लिम समाजात मोठा रोष निर्माण होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.**




**राज्यात विशेष मागास प्रवर्ग (अ) या प्रवर्गातील मुस्लिम समाजास जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र देण्यासंदर्भात शासन निर्णय व शासन परिपत्रक रद्द करण्याबाबत....**

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः सीबीसी-२०२३/प्र.क्र.१८१/मावक**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १७ फेब्रुवारी, २०२६.

**वाचा:-**
१) सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४, दि.०९.०७.२०१४. महाराष्ट्र राज्य विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) करिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अध्यादेश, २०१४ व या अध्यादेशाबाबत दि.१४.०७.२०१४ चे शुध्दिपत्र.
२) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र.अविवि-२०१४/प्र.क्र.८१/का-७, दि.१९.०७.२०१४.
३) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.सीबीसी-१०/२०१४/प्र.क्र.१३१/मावक, दि.२२.०७.२०१४.
४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी-२०१४/प्र.क्र.२१६-ए/२०१४/१६-ब, दि.२४.०७.२०१४.
५) शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.सीबीसी-१०/२०१४/प्र.क्र.१४०/मावक, दि.२८.०८.२०१४.
६) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी-२०१४/प्र.क्र.२१६-ए/२०१४/१६-ब, दि.०२.०३.२०१५.

**प्रस्तावना:-**
सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या मुस्लिम गटासाठी विशेष मागास प्रवर्ग-अ अंतर्गत शासकीय व निमशासकीय सरळसेवा भरतीमध्ये व शैक्षणिक संस्थेतील प्रवेशासाठी ५% आरक्षण सामान्य प्रशासन विभागाच्या वाचा क्र.१ येथील अध्यादेशान्वये विहीत करण्यात आले होते. त्यानुसार वाचा क्र.२ येथील अल्पसंख्याक विकास विभागाच्या शासन निर्णयान्वये सरळ सेवेच्या पदभरतीमध्ये विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) प्रवर्गासाठी ५% आरक्षण देण्यात आले होते.
अल्पसंख्याक विकास विभागाच्या वाचा क्र.२ येथील शासन निर्णयातील निदेशानुसार या विभागाकडून वाचा क्र.३ येथील शासन निर्णय व वाचा क्र.५ येथील शासन परिपत्रकान्वये विशेष मागास प्रवर्ग-अ मधील मुस्लिम समाजास नियमानुसार जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्रे देण्याबाबतची कार्यवाही करण्यासंदर्भात सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या.
सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. १४ विरोधात मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. २०५३/२०१४ श्री. संजित शुक्ला विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर संलग्न याचिका दाखल करण्यात आलेल्या होत्या. प्रस्तुत प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दि.१४.११.२०१४ रोजीच्या आदेशान्वये सदर अध्यादेशातील



कलम ४(१) मधील राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील सरळ सेवा प्रवेश नियुक्त्यांमधील ५% नियुक्त्या विशेष मागास प्रवर्ग -अ करिता राखून ठेवण्याच्या तरतुदीस अंतरिम स्थगिती दिलेली आहे.
सामान्य प्रशासन विभागाच्या वाचा क्र. १ येथील अध्यादेशाचे दिनांक २३.१२.२०१४ पर्यंत कायद्यात रुपांतर न झाल्याने सदरहू अध्यादेश व्यपगत झाला आहे. त्यानुषंगाने निर्गमित केलेले शासन निर्णय/ परिपत्रक आपोआप रद्दबातल ठरतात. त्या पार्श्वभूमीवर सामान्य प्रशासन विभागाने वाचा क्र.६ येथील दि.०२.०३.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये अध्यादेशास अनुसरून निर्गमित केलेला वाचा क्र.४ येथील दि.२४.०७.२०१४ रोजी शासन निर्णय रद्द केला आहे. सबब, उपरोक्त अध्यादेश व्यपगत झाल्याने या विभागाकडून निर्गमित केलेले शासन निर्णय/ परिपत्रक रद्दबातल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. उपरोक्त पार्श्वभूमीवर शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय:-**
या विभागाच्या वाचा क्र.३ येथील शासन निर्णय व वाचा क्र.५ येथील शासन परिपत्रक यांची अंमलबजावणी दि.१४.११.२०१४ पासून स्थगित करण्यात येत आहे.
२. सामान्य प्रशासन विभागाचा दि.०९.०७.२०१४ रोजीचा अध्यादेश (सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४) दि.२३.१२.२०१४ पर्यंत कायद्यात रुपांतर न झाल्याने व्यपगत झाला आहे. सबब, उक्त अध्यादेशाच्या पार्श्वभूमीवर या विभागाकडून वाचा क्र.३ येथील शासन निर्णय व वाचा क्र.५ येथील शासन परिपत्रक रद्द करण्यात येत आहेत.
३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०२१७१६३६१२७२२२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.
महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DESHMUKH
VARSHA GUNVANT
**(वर्षा देशमुख)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,
१. मा.राज्यपाल महोदय यांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.उपमुख्यमंत्री (नगरविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.उपमुख्यमंत्री (क्रिडा व युवक कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.मंत्री (महसूल), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा.मंत्री (सामाजिक न्याय), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा.राज्यमंत्री (सामाजिक न्याय) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८. मा.विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद /विधानसभा, विधानभवन, मुंबई
९. अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई
१०.महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
११.सर्व विभागीय आयुक्त.
१२.सर्व जिल्हाधिकारी.

### सन २०१४ मधील निर्णय

अल्पसंख्याक कल्याणमंत्री नसीम खान यांनी जुलै २०१४ मध्ये मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुस्लिम समुदायासाठी पाच टक्के आरक्षणाचा प्रस्ताव मांडला होता. कोणत्याही चर्चेशिवाय एकमताने हा प्रस्ताव मंजूर करण्यात आला होता.

## काय आहे शासन निर्णय?

राज्य सरकारतर्फे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या मुस्लिम गटासाठी विशेष मागास प्रवर्ग-अ अंतर्गत शासकीय व निमशासकीय सरळसेवा भरतीमध्ये व शैक्षणिक संस्थेतील प्रवेशासाठी पाच टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्या संदर्भातील शासन निर्णयही जाहीर करण्यात आला आहे. या शासन निर्णयानुसार सरळ सेवांच्या पदभरतीमध्ये विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) प्रवर्गासाठी पाच टक्के आरक्षण देण्यात आले होते.

या शासन निर्णयातील निर्देशानुसार अल्पसंख्याक विभागाकडून विशेष मागास प्रवर्ग-अ मधील मुस्लिम समाजास नियमानुसार जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्रे देण्याबाबतची कार्यवाही करण्यासंदर्भात सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र, या निर्णयाच्या विरोधात मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करण्यात आली होती. संजीत शुक्ला यांनी या संदर्भात २०१४ रोजी न्यायालयात धाव घेतली होती. अखेर या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयाने १४ नोव्हेंबर २०१४ रोजी आदेश देऊन, राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील सरळ सेवा प्रवेश नियुक्त्यांमधील पाच टक्के नियुक्त्या विशेष मागास प्रवर्ग-अ करिता राखून ठेवण्याच्या तरतुदीस अंतरिम स्थगिती दिली होती. त्यातच या संदर्भात जाहीर करण्यात आलेल्या अध्यादेशाचे कायद्यात रूपांतर न झाल्याने या अध्यादेश व्यपगत झाला आहे, परिणामी या संदर्भात जाहीर केलेले शासन निर्णय/परिपत्रक आपोआप रद्दबातल ठरतात. त्या पार्श्वभूमीवर सामान्य प्रशासन विभागाने या संदर्भातील आतापर्यंत २०१५ आणि २०१४मध्ये जाहीर झालेला शासन निर्णय रद्द करण्यात आला आहे.



# महापालिकेतील 24 नगरसेवकांविरोधात याचिका दाखल

## पराभूत उमेदवारांनी निवडून आलेल्या नगरसेवकांना खेचले न्यायालयात

**महाईन्यूज । पुणे**

**महापालिकेच्या 24 नवनिर्वाचित नगरसेवकांविरोधात न्यायालयात याचिका दाखल झाल्या आहेत. निवडणुकीतील पराभूत उमेदवारांनी विविध आक्षेप उपस्थित करीत निवडून आलेल्या नगरसेवकांना न्यायालयात खेचले आहे. त्यामुळे आता या नवनिर्वाचित नगरसेवकांवर न्यायालयाचे खेटे मारण्याची वेळ येणार आहे, तर तीन नगरसेवकांवर अनधिकृत बांधकाम केल्याप्रकरणी कारवाईची टांगती तलवार उभी राहिली आहे.**






चार वर्षांनंतर महापालिकेच्या निवडणुका पार पडल्या. निवडून येऊन 165 नगरसेवक सभागृहात आले आहेत. त्यात भारतीय जनता पक्षाचे सर्वाधिक 119, राष्ट्रवादी काँग्रेसचे 27, काँग्रेसचे 15, राष्ट्रवादी काँग्रेस (श.प) चे 3 आणि शिवसेना ठाकरे पक्षाचा 1 असे संख्याबळ आहे. मात्र, यामधील तब्बल 24 नगरसेवकांविरोधात लघुवाद न्यायालयात याचिका दाखल झाल्या आहेत. निवडणुकीतील निकालावर आक्षेप घेणाऱ्या याचिकांचा यामध्ये समावेश आहे.

प्रामुख्याने निवडणूक निकाल जाहीर झाल्यानंतर दहा दिवसांमध्ये विजयी उमेदवारांविरोधात याचिका दाखल करण्याची मुदत असते. त्यानुसार जिल्हा लघुवाद न्यायालयाकडून महापालिकेला 24 नगरसेवकांविरोधात दाखल झालेल्या याचिकांचे समन्स मिळाले असल्याचे महापालिकेच्या निवडणूक विभागाकडून सांगण्यात आले.

संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांना हे समन्स न्यायालयाकडून बजाविले जाते. प्रामुख्याने पराभूत उमेदवारांकडूनच या याचिका दाखल करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे आता निवडून आलेल्या या सर्व 24 नगरसेवकांना पुढील कालावधीत न्यायालयाच्या फेऱ्यात अडकावे लागणार आहे.

### अनधिकृत बांधकामांची तक्रार

एकीकडे 24 नगरसेवक न्यायालयाच्या फेऱ्यात अडकणार असतानाच याशिवाय अन्य तीन नगरसेवकांविरोधात अनधिकृत बांधकामाच्या तक्रारी दाखल झाल्या आहेत. यापूर्वीच्या कायद्यात नगरसेवकाने निवडून आल्यावर अनधिकृत बांधकाम केल्याचे सिद्ध झाल्यास त्याचे पद रद्द करण्याची तरतूद होती. आता मात्र सुधारित कायद्यानुसार जर संबंधित नगरसेवकाने निवडून येण्याआधीही बांधकाम केले असेल, तरीही त्याचे पद रद्द करण्याची तरतूद 10 (ड) नुसार करण्यात आली आहे. त्यानुसार आता प्रशासनाकडून या नगरसेवकांविरोधातील कारवाईचा प्रस्ताव आयुक्तांकडे मंजुरीसाठी ठेवला जाणार आहे. प्रशासनाच्या चौकशीत तक्रारीत तथ्य आढळल्यास संबंधित नगरसेवकांचे पद रद्द होऊ शकते.

# लोहगाव–वाघोली रस्त्यावर कंपनीला भीषण आग; सुदैवाने अनर्थ टळला!

**महाईन्यूज । पुणे**

**लोहगाव–वाघोली रस्त्यावरील त्रिमूर्ती लॉन्स परिसरातील एका कंपनीला बुधवारी दुपारी भीषण आग लागली. आगीचे स्वरूप पाहून परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) अग्निशमन दलाने दाखवलेली तत्परता आणि सात बंबांच्या मदतीने केलेल्या प्रभावी कारवाईमुळे मोठी जीवितहानी टळली असून आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले आहे.**



> “आगीची माहिती मिळताच आमचे पथक तातडीने रवाना झाले. ऑइल आणि ज्वलनशील पदार्थांमुळे आग वेगाने पसरत होती; मात्र वेळीच केलेल्या हस्तक्षेपामुळे शेजारील वस्ती वाचवता आली आणि मोठी हानी टळली.”
>
> -देवेंद्र पोटफोडे, मुख्य अग्निशमन अधिकारी, पीएमआरडीए.

लोहगाव-वाघोली रस्त्यावरील ‘मेडार्थ लॅब्ज प्रायव्हेट लिमिटेड’ या कंपनीत दुपारी एक वाजण्याच्या सुमारास अचानक आग भडकली. कंपनीच्या आवारात मोठ्या प्रमाणावर ऑइल, ग्रीस आणि अन्य ज्वलनशील साहित्य साठवलेले होते, ज्यामुळे आगीने रौद्ररूप धारण करून शेजारील फर्निचर मॉललाही विळखा घातला. मॉलमधील फर्निचर आणि दोन भरलेल्या गॅस सिलिंडरपर्यंत आग पोहोचल्याने परिस्थिती अत्यंत स्फोटक बनली होती. आगीची माहिती मिळताच, पीएमआरडीएच्या वाघोली अग्निशमन केंद्राचे दोन बंब काही मिनिटांतच घटनास्थळी दाखल झाले. आगीची तीव्रता लक्षात घेऊन पुणे महानगरपालिकेचे पाच बंबही मदतीसाठी पाचारण करण्यात आले. ऑइल आणि ग्रीसमुळे आग वेगाने पसरत असताना जवानांनी जीवाची बाजी लावत पाण्याचा मारा केला, तसेच ऑइलची आग विझवण्यासाठी 'फोम'चा वापर केला. गॅस सिलिंडरपर्यंत आग पोहोचलेली असतानाही अग्निशमन दलाच्या जवानांनी अत्यंत शिताफीने परिस्थिती हाताळत संभाव्य मोठा स्फोट टाळला.




सुदैवाने, आग लागताच कंपनीतील कर्मचारी आणि परिसरातील नागरिकांनी तातडीने सुरक्षित ठिकाणी स्थलांतर केल्यामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही. आगीवर पूर्णपणे नियंत्रण मिळवण्यात आले असून, त्यानंतर कुलिंगचे (थंड करण्याचे) काम सुरू करण्यात आले. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. या आगीत मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले असून, पोलीस आणि अग्निशमन विभागाकडून पंचनामा करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

# महापालिकेत आता सनदी अधिकाऱ्याची "एन्ट्री"

## पिंपरी-चिंचवड अतिरिक्त आयुक्तपदी आयएएसची प्रतिनियुक्ती

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**शहराच्या प्रशासनात मोठा बदल घडवणारा निर्णय राज्य शासनाने घेतला असून अतिरिक्त आयुक्त (एक) या महत्त्वाच्या पदावर आता भारतीय प्रशासकीय सेवेतील (IAS) सनदी अधिकाऱ्याची प्रतिनियुक्ती केली जाणार आहे. या निर्णयामुळे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकामध्ये दोन सनदी अधिकारी कार्यरत असतील. प्रशासनात पारदर्शकता, निर्णयक्षमतेत वेग आणि धोरणात्मक नियंत्रण वाढवण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.**

राज्य शासनाने महापालिकांतील अतिरिक्त आयुक्तांच्या नियुक्तीबाबत निश्चित कार्यपद्धती जाहीर केली आहे. त्यानुसार तीन अतिरिक्त आयुक्तांपैकी एक पद भारतीय प्रशासकीय सेवेतील (IAS) अधिकाऱ्यासाठी राखीव असेल. महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवेतील सह आयुक्त (गट-अ) संवर्गातील अधिकारी उपलब्ध असल्यास त्यांची नियुक्ती होईल. संबंधित संवर्गातील अधिकारी उपलब्ध नसल्यास राज्य सेवेतील अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्ती केली जाईल. या निर्णयामुळे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकामध्ये दोन सनदी अधिकारी कार्यरत असतील एक अतिरिक्त आयुक्त स्थानिक अधिकाऱ्यांमधून पदोन्नतीने नियुक्त केला जाईल. यामुळे अतिरिक्त आयुक्तपदाच्या नियुक्तीतील अनिश्चितता दूर होणार असून प्रशासन अधिक शिस्तबद्ध होणार आहे.




### स्थानिक अधिकाऱ्यांसाठी नवे निकष

स्थानिक अधिकाऱ्यांमधून अतिरिक्त आयुक्त पदासाठी पदोन्नतीच्या कार्यपद्धतीतही बदल करण्यात आला आहे. स्थानिक अधिकाऱ्यांमधून अतिरिक्त आयुक्त पदाच्या पात्रतेसाठी — सहायक/उपायुक्त पदावर किमान १५ वर्षांची सेवा, उपायुक्त समकक्ष किंवा वरिष्ठ वेतनश्रेणीतील विभागप्रमुख म्हणून १५ वर्षांचा अनुभव, मागील दहा वर्षांच्या गोपनीय अहवालांपैकी नऊ अत्युत्कृष्ट नोंदी आवश्यक असतील. यामुळे गुणवत्ताधारित निवड प्रक्रियेला बळ मिळणार आहे.

### पूर्णवेळ आयुक्तांची प्रतीक्षा

दरम्यान, ७ ऑक्टोबर २०२५ रोजी शेखर सिंह यांची नाशिक कुंभमेळा आयुक्तपदी बदली झाली. त्यानंतर महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांच्याकडे आयुक्तपदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे. मागील चार महिन्यांपासून महापालिकेला पूर्णवेळ आयुक्त मिळालेला नाही. त्यामुळे शहर प्रशासनात स्थैर्य आणण्यासाठी पूर्णवेळ आयुक्तांच्या नियुक्तीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. सनदी अधिकाऱ्याची अतिरिक्त आयुक्तपदी होणारी नियुक्ती ही केवळ प्रशासकीय बदल नसून, वाढत्या शहरासाठी धोरणात्मक आणि शिस्तबद्ध कारभाराची नांदी मानली जात आहे. आगामी काळात निर्णय प्रक्रियेत वेग, आर्थिक शिस्त आणि प्रकल्प अंमलबजावणीत काटेकोरपणा दिसून येईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### वादाच्या पार्श्वभूमीवर निर्णय

अतिरिक्त आयुक्त (एक) या पदावरून यापूर्वी अनेकदा अधिकाऱ्यांमध्ये वाद झाले होते. त्या पार्श्वभूमीवर तत्कालीन आयुक्त शेखर सिंह यांनी राज्य शासनाकडे एका अतिरिक्त आयुक्तपदी सनदी अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याची मागणी केली होती. शासनाने त्यास सकारात्मक प्रतिसाद देत कार्यपद्धतीत बदल केला आहे. सध्या महापालिकेत तीन अतिरिक्त आयुक्त कार्यरत असून ते सर्व राज्य सेवेतील आहेत. पूर्वी महसूल विभागातील अप्पर जिल्हाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांची नियुक्ती होत असे; मात्र गेल्या काही वर्षांत रेल्वे, वस्तू व सेवा कर आणि ग्रामविकास विभागातील अधिकाऱ्यांना संधी देण्यात आली आहे.

# पिंपरी-चिंचवड शहरातील सीसीटीव्ही कॅमेरे बंद

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांपैकी अनेक कॅमेरे सध्या बंद अवस्थेत असल्याचा गंभीर मुद्दा समोर आला आहे. यासंदर्भात माजी विरोधी पक्षनेते नगरसेवक विनोद जयवंत नढे यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आयुक्तांना निवेदन दिले आहे. शहरातील सर्व सीसीटीव्ही कॅमेरे तातडीने सुरू करण्याची मागणी विनोद नढे यांनी केली आहे.**




### नगरसेवक विनोद नढे यांनी मागवली माहिती

- शहरात एकूण किती सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत आहेत आणि किती बंद आहेत?
- बंद कॅमेरे दुरुस्त करण्यासाठी प्रशासनाने कोणती पावले उचलली आहेत?
- कॅमेऱ्यांच्या देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी कोणत्या ठेकेदाराकडे आहे? संबंधित कंपनीचे नाव काय?
- या प्रकल्पासाठी किती निधी खर्च करण्यात आला असून किती रकमेचे वर्क ऑर्डर देण्यात आले आहेत?
- ठेकेदाराला आतापर्यंत किती देयके अदा करण्यात आली? त्याचे बिल तपशील काय?
- करारातील अटींनुसार देखभाल न झाल्यास कोणती दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे?



शहरात महापालिका व स्मार्ट सिटी उपक्रमांतर्गत विविध ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. मात्र, सध्या अनेक कॅमेरे कार्यरत नसल्याने गुन्हे तपासात अडथळे निर्माण होत असून नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे, असे त्यांनी नमूद केले आहे.

“सीसीटीव्ही यंत्रणा बंद राहणे म्हणजे शहराची सुरक्षितता धोक्यात आहे. याबाबत तातडीने उपाययोजना करून सर्व कॅमेरे कार्यरत करावेत,” अशी मागणी विनोद नढे यांनी केली आहे. या निवेदनानंतर महापालिका प्रशासनाकडून नेमकी काय भूमिका घेतली जाते आणि बंद कॅमेरे पुन्हा कार्यरत करण्यासाठी कोणती पावले उचलली जातात, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

शहरातील प्रमुख चौक, गर्दीची बाजारपेठ, शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात तसेच संवेदनशील भागांमध्ये बसविण्यात आलेले कॅमेरे बंद असल्यास गुन्हेगारांना मोकळे रान मिळण्याची भीती व्यक्त होत आहे. पोलिसांना तपासासाठी सीसीटीव्ही फुटेज अत्यंत महत्त्वाचे ठरत असते. त्यामुळे ही यंत्रणा प्रभावी आणि सातत्याने कार्यरत राहणे आवश्यक आहे.



## भूमिका

**परिवर्तन हा जगाचा शाश्वत नियम आहे. काळानुसार तंत्रज्ञान बदलते आणि त्यातून नव्या युगाची सुरुवात होते. संगणक क्रांतीनंतर जगाने संगणकयुग अनुभवले; आता कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच एआय नव्या युगाची चाहूल देत आहे. कोणतेही तंत्रज्ञान जेव्हा व्यापक बदल घडवते, तेव्हा त्याचे दूरगामी परिणाम होत असतात.**

# नव्या युगाच्या दिशेने..!




या पार्श्वभूमीवर नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे आयोजित ‘इंडिया एआय इम्पॅक्ट समिट’ विशेष महत्त्वाची ठरते. ‘सर्वजन हिताय, सर्वजन सुखाय’ हे या परिषदेचे ब्रीदवाक्य भारतीय संस्कृतीच्या मूलभूत तत्त्वांना अधोरेखित करणारे आहे—तंत्रज्ञानाचा उपयोग सर्वांच्या कल्याणासाठी व्हावा, हा त्यामागील विचार आहे. महात्मा गांधींनी तंत्रज्ञानाचा विरोध कधीच केला नाही; मात्र तंत्रज्ञानामुळे रोजगार हिरावले जात असतील, तर त्याबाबत सावधगिरी बाळगावी, असे ते म्हणाले होते. एआयच्या वाढत्या प्रभावाच्या पार्श्वभूमीवर गांधींचे हे विचार आजही तितकेच सुसंगत वाटतात. एआय ही कृत्रिम बुद्धिमत्ता असली तरी तिच्या मर्यादा आहेत. रोबोटच्या आगमनावेळीही माणसाची गरज संपेल, अशी भीती व्यक्त झाली होती; परंतु शेवटी नियंत्रण माणसाच्याच हातात राहिले. एआयबाबतही हेच लागू पडते. आज कृषी, शिक्षण, आरोग्य, संशोधन, उद्योग अशा सर्व क्षेत्रांत एआयचा वापर वाढत आहे. त्यामुळे नव्या संधी निर्माण होत असतानाच काही आव्हानेही समोर येत आहेत. काही क्षेत्रांत मनुष्यबळ कमी होण्याची शक्यता असली तरी एआयमधून नव्या रोजगारांची निर्मितीही होऊ शकते. काळानुसार तंत्रज्ञान बदलते आणि त्यातून नव्या युगाची सुरुवात होते. उपलब्ध माहितीचा मोठा साठा एआयमुळे सहज मिळतो; एआय नव्या युगाची चाहूल देत आहे. मात्र त्या माहितीची सत्यता पडताळणे तितकेच आवश्यक आहे. एआय हे साधन आहे—मानवाच्या बुद्धिमत्तेचे पर्याय नाही. प्रतिभा, सर्जनशीलता आणि विचारशक्ती यांचे महत्त्व कायम राहणार आहे. एआयचा योग्य आणि जबाबदारीने वापर करण्यासाठी कौशल्य आवश्यक आहे. ती दुधारी तलवार आहे—योग्य वापर केल्यास संधी, चुकीच्या वापराने धोका. देशाचे मुख्य वैज्ञानिक सल्लागार अजयकुमार सूद यांनीही एआयतील धोके कमी करून संधींचा जास्तीत जास्त उपयोग करण्यावर भर दिला आहे. विशेषतः मुलांवर एआयचा होणारा परिणाम अभ्यासण्याची गरज आहे. लहान वयातच हे तंत्रज्ञान हाताळताना त्यांच्या जिज्ञासू वृत्तीवर व मानसिक आरोग्यावर परिणाम होणार नाही ना, याची काळजी घ्यावी लागेल. या परिषदेत ऑस्ट्रेलिया, जपान, रशिया, ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, इटली, नेदरलँड्स, स्वित्झर्लंड, सर्बिया, ताजिकिस्तान, एस्टोनिया आणि आफ्रिकेतील देशांसह १३ देशांचा सहभाग आहे. सुमारे अडीच लाख प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. जागतिक स्तरावर वाढ, रोजगारनिर्मिती आणि सार्वजनिक सेवा सुधारण्यासाठी एआय महत्त्वाचे ठरणार असल्याचे ब्रिटनचे पंतप्रधान डेव्हिड लॅमी यांनी नमूद केले आहे. अमेरिका आणि चीन सध्या एआय क्षेत्रात आघाडीवर आहेत; ब्रिटन व कॅनडाही वेगाने पुढे येत आहेत. त्यामुळे भारतानेही स्पष्ट धोरण आखून एआयमध्ये गुंतवणूक वाढवणे आवश्यक आहे. निधीची तरतूद पुरेशी असणे आणि त्याचा प्रभावी वापर होणे या दोन्ही बाबी तितक्याच महत्त्वाच्या आहेत. एआयचा संतुलित, सर्वसमावेशक आणि मानवकेंद्री वापर केल्यास भारत नव्या युगात आत्मविश्वासाने प्रवेश करू शकेल, यात शंका नाही.

## प्रासंगिक »

### काल्पनिक मर्यादा

***गरुडाचे अंडे एका कोंबडीच्या पंखाखाली ठेवले, यथावकाश अंडे उबवल्यावर त्यातून गरुडाचे पिल्लू पडलं. पण ते सदासर्वकाळ कोंबडीच्या इतर पिल्लांबरोबर राहत असल्याने त्याने स्वत:ला कधीच ओळखले नाही व ते स्वत:ला कोंबडीचे पिल्लू समजू लागले.***

कोंबडीच्या पिल्लांच्या अनुकरणामुळे घाणीत अडकलेले धान्याचे कण वेचणे, कर्कश्य आवाज करत इकडेतिकडे हिंडणे यातच त्याचा वेळ जावू लागला. कोंबडीच्या पिल्लांना त्याने विचारला,"हा कोणता पक्षी आहे? किती उंच उडतो आहे? त्याचा रुबाब सुद्धा पाहण्यासारखा आहे." हे एकच त्यातील कोंबडीचे पिल्लू त्याला म्हणाले," तो गरुड पक्षी आहे. आपण हि कोंबडी आहोत असेच गरुडाचे पिल्लू म्हणू लागले. यशस्वी होण्यासाठी जन्माला आलेल्या त्या गरुडाला आपल्या काल्पनिक मर्यादेमुळे अपयशी जीवन जगावे लागले.

तात्पर्य- आपल्यातील कर्तुत्वाला वाव आपणच दिला पाहिजे, आपण आपल्या क्षमता जर ओळखल्या नाहीत तर अपयशाचे धनी व्हावे लागते.

शिवजयंती हा केवळ उत्सव नाही, तर स्वाभिमान, स्वराज्य आणि स्वसंस्कृतीच्या जागृतीचा दिवस आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचे नव्हे, तर संपूर्ण भारताचे आदर्श राष्ट्रनायक आहेत.

# स्वराज्याचा अखंड प्रेरणास्त्रोत

त्यांच्या कार्याचा विचार केला की पराक्रमासोबतच दूरदृष्टी, शिस्तबद्ध प्रशासन आणि लोककल्याणाची तळमळ स्पष्टपणे जाणवते.

१७व्या शतकात परकीय सत्तांच्या छायेखाली खचलेल्या समाजाला स्वराज्याचे स्वप्न दाखवण्याचे धाडस शिवरायांनी केले. स्वराज्य ही केवळ राजकीय संकल्पना नव्हती, तर ती जनतेच्या आत्मसन्मानाची चळवळ होती. रायगडाच्या सिंहासनावर बसताना त्यांनी प्रजेला केंद्रस्थानी ठेवले. किल्ल्यांची बांधणी, सक्षम आरमाराची उभारणी आणि शिस्तबद्ध लष्कर यामुळे त्यांनी मराठा साम्राज्य भक्कम केले. शिवाजी महाराजांचे प्रशासन अत्यंत लोकाभिमुख होते. शेतकऱ्यांचे संरक्षण, स्त्रियांचा सन्मान आणि धर्मनिरपेक्षतेची भूमिका ही त्यांच्या राज्यकारभाराची वैशिष्ट्ये होती. युद्धभूमीवर शौर्य दाखवताना त्यांनी नैतिकतेची मर्यादा कधी ओलांडली नाही. शत्रूच्या स्त्रियांना सन्मानाने वागवण्याची परंपरा त्यांनी निर्माण केली. त्यामुळेच त्यांचे व्यक्तिमत्त्व केवळ योद्ध्याचे न राहता



आदर्श शासकाचे ठरते. आजच्या काळात शिवाजी महाराजांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. नेतृत्व म्हणजे केवळ सत्ता नव्हे, तर जबाबदारी आणि जनतेप्रती बांधिलकी, हे त्यांनी कृतीतून दाखवून दिले. संघटनशक्ती, धोरणात्मक निर्णयक्षमता आणि राष्ट्रप्रेम या गुणांचा संगम त्यांच्या ठायी होता. शिवजयंती निमित्त आपण केवळ घोषणांपुरते मर्यादित न राहता त्यांच्या आदर्शांचा अंगीकार केला पाहिजे. स्वराज्याची संकल्पना आज सुशासन, पारदर्शकता आणि सामाजिक न्यायाच्या रूपाने जपली गेली पाहिजे. तरुण पिढीने शिवरायांकडून धैर्य, शिस्त आणि स्वाभिमानाचे धडे घ्यावेत. छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन म्हणजे प्रेरणेचा अखंड झरा आहे. त्यांच्या कार्याची स्मृती केवळ इतिहासात नाही, तर प्रत्येकाच्या मनात जिवंत राहिली पाहिजे. शिवजयंती हा दिवस आपल्याला आपल्या संस्कृतीची, परंपरेची आणि राष्ट्रभक्तीची जाणीव करून देतो. शिवरायांनी उभे केलेले स्वराज्य हे केवळ भौगोलिक सीमा विस्तारण्यापुरते मर्यादित नव्हते, तर ते न्याय, समानता आणि सुरक्षिततेच्या तत्त्वांवर आधारलेले होते. त्यांनी सामान्य माणसाला राज्यकारभाराच्या केंद्रस्थानी ठेवून लोकाभिमुख शासनाची पायाभरणी केली.

## ।। अभंगवाणी ।।



शुकसनकादिकीं उभारिला बाहो |
परिक्षिती लाहो दिसां सातां ॥१॥

उठा उठी करी स्मरणाचा धांवा |
धरवत देवा नाहीं धीर ॥2 ॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# अजित पवारांबरोबरच्या प्रवासात काय ठरलं होतं?

## प्रदेशाध्यक्ष पदाच्या चर्चेबाबत अमोल कोल्हेंनी स्पष्टच सांगितलं!

**महाईन्यूज । मुंबई**

**अजित पवारांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणासंदर्भात अनेक उलटसुलच चर्चा रंगल्या. शरद पवार आणि अजित पवार यांच्यात झालेल्या चर्चा आणि बैठकांचे कथित व्हिडिओही समोर आले. तसंच, अजित पवारांनी जयंत पाटलांच्या घरी जाऊन बैठका घेतले असल्याचंही शरद पवार गटातील नेत्यांनी सांगितलं.**





दरम्यान, हे दोन्ही पक्ष एकत्र आले असते तर शिरूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे संयुक्तिक राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष झाले असते, अशी माहिती आज रोहित पवारांनी पत्रकार परिषदेत दिली. यावर अमोल कोल्हे यांनीही उत्तर दिलं आहे.

रोहित पवार म्हणाले, संयुक्तिक राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष डॉ. अमोल कोल्हे झाले असते. अशी दादांची इच्छा होती. त्यामुळे अमोल कोल्हे प्रामाणिकपणे पुढाकार घेत होते.


याबाबत अमोल कोल्हे, सुप्रिया ताई, शशिकांत शिंदेंनी सांगितलंय. दोन्ही पक्षांच्या एकत्रीकरणाकरता जयंत पाटलांच्या घरी १३ बैठका झाल्या आहेत. पाहिजेतर सीसीटीव्ही फुटेज तपासा. जयंत पाटलांनीही याबाबत स्पष्टीकरण दिलं आहे."

### अमोल कोल्हे काय म्हणाले?

"जे काही ठरलं होतं ते पब्लिक डोमेनमध्ये बऱ्याचदा आलेलं आहे. दोन्ही पक्षाच्या एकत्रिकरणाच्या चर्चा झाल्या होत्या, ही वस्तुस्थिती आहे. १६ मे रोजी मी अजित पवारांबरोबर प्रवास केला होता. बारामती ते पुणे असा हा प्रवास होता. तेव्हापासून मी या प्रक्रियेमध्ये आहे. माळेगाव सहकारी साखर कारखान्याची प्रचारसभा संपवून आम्ही हा प्रवास केला होता", असं अमोल कोल्हे म्हणाले. तसंच, दोन्ही पक्षांच्या एकत्रीकरणाकरता १४ बैठका झाल्या होत्या, ११ वेळा जंयत पाटलांच्या घरी बैठका झाल्या होत्या. ही वस्तुस्थिती आहे", यावरही त्यांनी जोर दिला. अमोल कोल्हेंनी झी २४ तासला दिलेल्या मुलाखतीत वरील भाष्य केलं आहे.

### प्रफुल पटेलांचं म्हणणं काय?

आमचा पक्ष वेगळा आहे. आमच्या पक्षातील नेतृत्त्वाची जागास पक्ष संघटनेची जागा भरण्याची जबाबदारी आमची आहे. त्यामुळे अजित पवारांच्या निधानानंतर अशी चर्चा करणं योग्य नाही, असं राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकारी अध्यक्ष प्रफुल पटेल म्हणाले.



# लाचखोरीच्या जाळ्यात संगमनेरमधील तिघे जेरबंद

**महाईन्यूज । संगमनेर**

जात दाखला व जात पडताळणी प्रमाणपत्रासाठी लाचेची मागणी केल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने आश्वी बुद्रुक येथील तलाठीसह दोन खासगी व्यक्तींना रंगेहात ताब्यात घेतले. सहा हजार रुपयांची रक्कम स्वीकारताना ही कारवाई करण्यात आली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या माहितीनुसार, बाबासाहेब गंगाधर बोऱ्हाडे (वय ५७) हे तलाठी म्हणून कार्यरत असून त्यांनी तक्रारदाराकडून कुणबी जातीचा दाखला व जात पडताळणी प्रमाणपत्रासाठी यापूर्वी १३ हजार रुपये घेतल्याचा आरोप आहे. तक्रारदाराच्या बहिणीच्या दाखल्यासाठी पुन्हा १३ हजार रुपयांची मागणी करण्यात आली होती. त्यापैकी पहिल्या टप्प्यात सहा हजार रुपये स्वीकारण्याचे ठरले.

मंगळवारी सायंकाळी रचलेल्या सापळ्यात हितेश सोमनाथ घोडेकर (रा. ढोलेवाडी) यांनी तक्रारदाराकडून सहा हजार रुपये स्वीकारून ते प्रतीक विजयकुमार कातोरे (रा. सांगवी) यांच्याकडे दिले. यानंतर एसीबीच्या पथकाने तिघांनाही ताब्यात घेतले. या कारवाईचे नेतृत्व पोलीस उपअधीक्षक अजित त्रिपुटे यांनी केले.


दरम्यान, कोणत्याही शासकीय कामासाठी लाचेची मागणी झाल्यास नागरिकांनी १०६४ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केले आहे.

# अर्थविश्व: 'डीएमके' जावळी सहकारी बँकेचे प्रगतीचे पाऊल!

**महाईन्यूज । कुडाळ (सातारा)**

**सर्वसामान्य जनतेची अर्थवाहिनी समजल्या जाणाऱ्या दत्तात्रय महाराज कळंबे डी.एम.के. जावळी सहकारी बँकेने आपल्या प्रगतीचा टप्पा उंचावत नवी मुंबईतील तुर्भे येथे २५ व्या शाखेचा विस्तार केला आहे. या रौप्यमहोत्सवी शाखेचे उद्घाटन विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडले. जावळीची अस्मिता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या बँकेने सामान्य नागरिकांच्या विश्वासाच्या जोरावर हे यश संपादन केले असल्याचे प्रतिपादन मान्यवरांनी यावेळी व्यक्त केले.**






यावेळी विधानपरिषदेचे आमदार शशिकांत शिंदे, माथाडी कामगार नेते आमदार नरेंद्र पाटील, नवी मुंबईच्या महापौर सौ. सुजाता सूरज पाटील, जावली बँकेचे मार्गदर्शक वसंतराव मानकुमरे, शिवसेनेचे युवा नेते अंकुश बाबा कदम, बँकेचे विध्यमान अध्यक्ष विक्रम भिलारे, उपाध्यक्ष चंद्रकांत दळवी यांच्यासह बँकेचे सर्व संचालक व अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी बँकेचे अध्यक्ष विक्रम भिलारे यांनी बँकेच्या कार्याचा आढावा घेतला. तुर्भे परिसरातील नागरिकांना ही नवी शाखा अधिक सक्षम, विश्वासार्ह आणि सुलभ बँकिंग सेवा देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या उद्घाटन समारंभाला माथाडी नेते चंद्रकांत पाटील, बळवंतराव पवार, नगरसेविका सौ. शुभांगी पाटील, नगरसेवक रविकांत पाटील, सौ. कविता पाटील, सौ. मीरा पाटील, बँकेचे माजी अध्यक्ष चंद्रकांत गावडे यांच्यासह बँकेचे संचालक योगेश गोळे, अजित कळंबे, प्रकाश मस्कर, संतोष कळंबे, बाळासाहेब भालेघरे, विश्वनाथ धनावडे, रामचंद्र चिकणे, गणेश भोसले, विजय कदम, चंद्रकांत गवळी, विजय सावले, तुकाराम शिंदे, सौ. जयश्री मानकुमरे, सौ. उमिता रांजणे, तसेच प्रवीण शिंदे, अशोक चव्हाण व मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते.

### सर्वसामान्यांसाठी उभी राहिलेली संस्था...

कार्यक्रमात मार्गदर्शन करताना आमदार शशिकांत शिंदे म्हणाले की, "दत्तात्रय कळंबे महाराजांनी लावलेले हे सहकाराचे रोपटे आज वटवृक्षाच्या दिशेने वाटचाल करत आहे. सभासदांचे हित जोपासणे आणि उद्योजकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे हे बँकेचे मुख्य ध्येय राहिले आहे. महाराजांचा वारकरी संप्रदायाचा विचार घेऊन सध्याच्या पदाधिकाऱ्यांनी प्रगतीची ही वाटचाल कायम ठेवावी. जावळीच्या नावाला उजाळा देण्याचे काम सर्वांनी एकजुटीने करावे, कारण ही बँक सर्वसामान्यांसाठी उभी राहिलेली संस्था आहे."

# भारताच्या निर्णयामुळे पाकिस्तानचे कंबरडे मोडणार?

## रावी नदीतून पाकिस्तानकडे जाणारा अतिरिक्त जलप्रवाह रोखण्याची योजना

**महाईन्यूज । दिल्ली**

**भारताने दहशतवादाला खतपाणी घालणाऱ्या पाकिस्तानला आणखी एक तडाखा देण्याची तयारी केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने रावी नदीतून पाकिस्तानकडे जाणारा अतिरिक्त जलप्रवाह रोखण्याची योजना आखली आहे. गेल्या वर्षी झालेल्या पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने सिंधू जल कराराबाबत आधीच कठोर भूमिका घेतली आहे.**



### भारतासाठी हा प्रकल्प किती महत्त्वाचा?

शाहपूर कांडी धरण पूर्ण झाल्यानंतर त्याचा भारताला मोठा फायदा होणार आहे. पंजाब सरकारच्या अंदाजानुसार, या प्रकल्पामुळे सुमारे ११,८५६ एकर अतिरिक्त शेतीला पाणीपुरवठा होणार आहे. विशेषतः राजस्थानमधील अपर बारी क्षेत्रात व्यापक सिंचन सुविधा उपलब्ध होणार आहेत. अहवालानुसार, या धरणामुळे पंजाबमधील १२,३५५ एकर आणि जम्मू-काश्मीरमधील ७९,५०१ एकर शेती क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. त्याशिवाय धरणातून २०६ मेगावॅट वीजनिर्मिती होणार असल्याने देशातील वीजपुरवठ्यात मोठी भर पडणार आहे. उत्तर भारतात जलक्रीडा (वॉटर स्पोर्ट्स) पर्यटनालाही या प्रकल्पामुळे मोठी चालना मिळेल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

### पाकिस्तानवर काय परिणाम होईल?

भारताचा शाहपूर कांडी धरण प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर पाकिस्तानला त्याचा मोठा फटका बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अनेक वर्षांपासून रावी नदीचे अतिरिक्त पाणी माधोपूरमार्गे पाकिस्तानात जात आहे; पण आता ते पूर्णपणे रोखले जाईल, असे मंत्री जावेद अहमद राणा यांनी स्पष्ट केले आहे. पाकिस्तानमधील प्रमुख शहर लाहोर हे रावी नदीच्या पाण्यावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. या नदीचे पाणी लाहोरच्या भूजल पातळीसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. त्याशिवाय रावी नदीच्या काठावर शहरी विकास घडवून आणण्यासाठी पाकिस्तानने उभारलेल्या RAVI URBAN DEVELOPMENT AUTHORITY या प्रकल्पांनाही मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. दक्षिण आशियावरील धोरणात्मक विश्लेषण करणाऱ्या SOUTH ASIAN VOICES च्या अहवालानुसार, भारताने जर पाकिस्तानकडे जाणारे रावी नदीचे पाणी पूर्णपणे थांबवले, तर लाहोरमध्ये पाणीबाणीचे भयानक संकट येऊ शकते. त्यामुळे भारताच्या या निर्णयाविरोधात पाकिस्तानमधील जनतेचा रोष वाढण्याची शक्यता आहे.

गेल्या वर्षी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने सिंधू जल करार संदर्भात कठोर भूमिका घेतली होती. या पार्श्वभूमीवर रावी नदीतील अतिरिक्त पाणी अडवण्याच्या हालचालींना वेग आला आहे. जलप्रवाहात कपात झाल्यास पाकिस्तानला विशेषतः उन्हाळ्यात पाणीटंचाईचा सामना करावा लागू शकतो, असे निरीक्षण व्यक्त केले जात आहे.

शाहपूर कांडी धरणाची संकल्पना प्रथम १९७९ मध्ये मांडण्यात आली होती. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी १९८२ मध्ये या प्रकल्पाची पायाभरणी केली होती. पंजाब आणि जम्मू-काश्मीरमधील वादांमुळे प्रकल्पाला विलंब झाला; मात्र २००८ मध्ये तो राष्ट्रीय प्रकल्प म्हणून घोषित करण्यात आला.

सुमारे ३,३९४.४९ कोटी रुपयांचा हा प्रकल्प असून त्यातील २,६९४.०२ कोटी रुपये पंजाब सरकारने तर उर्वरित निधी केंद्र सरकारने दिला आहे. धरणाची उंची ५५.५ मीटर असून ७.७ किलोमीटर लांबीचा जलविद्युत कालवा यामध्ये समाविष्ट आहे. जम्मू-काश्मीरचे मंत्री जावेद अहमद राणा यांनी माध्यमांशी बोलताना प्रकल्पाचे काम निर्धारित वेळेत पूर्ण होईल, असे सांगितले. हा प्रकल्प दुष्काळग्रस्त कठुआ आणि सांभा जिल्ह्यांसाठी महत्त्वाचा ठरणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

१९६० मध्ये झालेल्या सिंधू जल करारानुसार सिंधू नदी, झेलम नदी व चिनाब नदी या नद्यांचे पाणी वापरण्याचा अधिकार पाकिस्तानला देण्यात आला आहे; तर बियास नदी आणि सतलज नदी यांसह रावी नदीवरील नियंत्रण भारताकडे आहे. करार स्थगितीनंतर भारताने सावलकोट, रॅटल, बुरसर, पकल दुल, क्वार, किरू आणि किर्थाई आदी जलविद्युत प्रकल्पांना गती दिली आहे.

भारताच्या या भूमिकेबाबत पाकिस्तानकडून आंतरराष्ट्रीय स्तरावरही प्रतिक्रिया नोंदवण्यात आल्या आहेत. संयुक्त राष्ट्रांतील पाकिस्तानचे स्थायी प्रतिनिधी असीम इफ्तिकार अहमद यांनी हा मुद्दा आंतरराष्ट्रीय व्यवस्थेशी संबंधित असल्याचे मत व्यक्त केले आहे. तसेच पाकिस्तानने हेग येथील न्यायालयातही धाव घेतल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, भारताने आपल्या भूमिकेचा पुनरुच्चार करत राष्ट्रीय हित सर्वोच्च असल्याचे स्पष्ट केले आहे.

# भारतप्रत्यर्पणावर प्रश्नचिन्ह; विजय मल्ल्याचा कोर्टात दावा

**महाईन्यूज । मुंबई**

**आपण भारतात कधी परत येऊ हे सांगू शकत नाही, असे फरारी आर्थिक गुन्हेगार (एफईओ) आणि मद्यसम्राट विजय मल्या याच्यातर्फे गुरुवारी उच्च न्यायालयात सांगण्यात आले.**



भारतात येऊन कायद्याच्या वैधतेला आव्हान देणारे प्रकरण चालवावे, असे नमूद करून भारतात येणार की नाही हे स्पष्ट करण्यासाठी न्यायालयाने मल्या याला मागील सुनावणीच्या वेळी शेवटची संधी दिली होती. त्या पार्श्वभूमीवर मल्या याच्या याचिकेवर गुरुवारी सुनावणी झाली. त्यावेळी, इंग्लंड आणि वेल्स सोडण्याची किंवा तसा प्रयत्न करण्याची अथवा कोणत्याही आंतरराष्ट्रीय प्रवास दस्तऐवजासाठी अर्ज करण्याची आपल्याला परवानगी नाही, ते स्वतःकडे ठेवण्याची आपल्याला परवानगी नाही. त्यामुळे, भारतात कधी परत येऊ हे स्पष्टपणे सांगू शकत नाहीत, असे मल्या याच्यातर्फे न्यायालयाला सांगण्यात आले.

दरम्यान, मल्या हा त्याच्याविरोधात सुरू केलेल्या कार्यवाहीपासून पळ काढून दिलासा मागू शकत नाही, असेही मुख्य न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने मल्या याला उपरोक्त भूमिका स्पष्ट करण्याचा इशारा देताना स्पष्ट केले होते. मल्या हा परत येण्यास इच्छुक नाही असे प्रतिज्ञापत्राद्वारे स्पष्ट करू शकतो. परंतु, त्याला फरारी आर्थिक गुन्हेगार कायद्याला आव्हान द्यायचे असल्यास भारतीय न्यायक्षेत्रात यावेच लागेल, असेही न्यायालयाने मल्याला भारतात परत येणार की नाही याबाबत भूमिका स्पष्ट करण्याची शेवटची संधी देताना स्पष्ट केले.

### विजय मल्ल्यासमोर न्यायालयाचा सवाल

फरारी आर्थिक गुन्हेगार घोषित करण्यात आलेले मद्यसम्राट विजय मल्ल्या यांनी उच्च न्यायालयात आपण भारतात कधी परत येऊ शकतो हे सांगणे शक्य नसल्याचे नमूद केले. इंग्लंड-वेल्समधून बाहेर जाण्यास तसेच प्रवास कागदपत्र ठेवण्यास परवानगी नसल्यामुळे परतण्याची तारीख निश्चित करता येत नसल्याचे त्यांनी सांगितले. न्यायालयाने मात्र फरारी स्थितीतून कायद्याला आव्हान देता येणार नाही, असे स्पष्ट करत भारतीय न्यायक्षेत्रात हजर राहून भूमिका स्पष्ट करण्याची शेवटची संधी दिली आहे.

# श्रद्धा कपूरने 'या' अभिनेत्यासोबत कापला केक



अभिनेत्री श्रद्धा कपूर सध्या तिच्या आगामी चित्रपट 'EETHA'मुळे चर्चेत आहे. या चित्रपटाचे पुणे येथील चित्रीकरण नुकतेच पूर्ण झाले. शेड्यूल संपल्याचा आनंद साजरा करण्यासाठी सेटवर केक कापण्यात आला. यावेळी श्रद्धासोबत अभिनेता रणदीप हुड्डा, दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर आणि संपूर्ण चित्रपटाची टीम उपस्थित होती. केक कापतानाचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.'ईथा' हा चित्रपट महाराष्ट्रातील प्रसिद्ध लावणी आणि तमाशा कलाकार विठाबाई भाऊ मांग नारायणगावकर यांच्या जीवनावर आधारित आहे. त्यांच्या संघर्षमय आणि प्रेरणादायी आयुष्याची कथा या चित्रपटातून मोठ्या पडद्यावर मांडली जाणार आहे. श्रद्धा कपूर या चित्रपटात पहिल्यांदाच अशा वेगळ्या आणि आव्हानात्मक भूमिकेत दिसणार आहे. ती मराठी मुलगी साकारताना पाहण्यासाठी चाहत्यांमध्ये उत्सुकता वाढली आहे.पुण्यातील शेड्यूल पूर्ण झाल्यानंतर संपूर्ण टीमने एकत्र येत छोटेखानी समारंभ केला.

# हार्वर्डच्या मंचावर प्रियंका चोप्राचा संदेश



बॉलिवूड आणि हॉलिवूडमध्ये आपली वेगळी ओळख निर्माण करणारी अभिनेत्री प्रियंका चोपड़ा हिने नुकतेच अमेरिकेतील प्रतिष्ठित HARVARD BUSINESS SCHOOL येथे विद्यार्थ्यांना प्रेरणादायी भाषण दिले. 'इंडिया वीक'च्या समारोप कार्यक्रमात तिला प्रमुख वक्ता म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. या कार्यक्रमात तिने भारतीय विद्यार्थ्यांशी मनमोकळेपणाने संवाद साधला आणि त्यांना मोठी प्रेरणा दिली.प्रियंकाने आपल्या भाषणात "आपण ज्या भारताची कल्पना करतो, तो भारत कोणता?" या विषयावर विचार मांडले. सुरुवातीला हा विषय सोपा वाटला, पण समोर बसलेले तरुण विद्यार्थी पाहिल्यावर तिच्या मनात एकच भावना आली "तुम्हीच तो भारत आहात, ज्याची मी कल्पना केली होती." तिच्या या वाक्याने संपूर्ण सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला. तिने आपल्या शालेय जीवनाच्या आठवणीही सांगितल्या. वयाच्या 12व्या वर्षी ती अमेरिकेतील आयोवा राज्यातील सीडर रॅपिड्स हायस्कूलमध्ये शिकायला गेली होती. त्यानंतर 90च्या दशकात ती मॅसॅच्युसेट्समधील न्यूटन नॉर्थ हायस्कूलमध्ये शिक्षण घेत होती. त्या काळात तिच्यासारखे दिसणारे विद्यार्थी खूप कमी होते. त्यामुळे कधी कधी तिला वेगळेपणाची जाणीव व्हायची. मात्र, आज 30 वर्षांनंतर हार्वर्डच्या मंचावर उभं राहून भारतीय विद्यार्थ्यांनी भरलेलं सभागृह पाहताना तिच्या डोळ्यांत आनंदाश्रू आले.प्रियंकाने विद्यार्थ्यांना सांगितले की, आपण सगळे आपल्या पालकांच्या आणि आधीच्या पिढ्यांच्या मेहनतीवर उभे आहोत. त्यांच्या त्यागामुळेच आज आपल्याला ही संधी मिळाली आहे. त्यामुळे आपल्या स्वप्नांसाठी धैर्याने पुढे जा. स्वतःचा सर्वोत्तम अवतार बनण्याचा प्रयत्न करा. यश मिळवताना इतरांबरोबरच स्वतःशीही दयाळू राहा, असा सल्ला तिने दिला.तिने आपल्या मुलीबद्दलही भावना व्यक्त केल्या.

# मृण्मयी देशपांडे महाबळेश्वरला स्थायिक



एखादी आघाडीची अभिनेत्री कसं आयुष्य जगत असेल? असा प्रश्न कोणी आपल्याला विचारला, तर डिझायनर कपडे, महागड्या वस्तू, आलिशान घर, कायम तिच्या मदतीला असणारे दोन-तीन सहकारी असं चित्र सामान्य माणसाच्या डोळ्यासमोर उभं राहतं. पण, मराठी कलाविश्वातील बऱ्याच अभिनेत्री याला अपवाद ठरल्या आहेत. यापैकी एक अभिनेत्री म्हणजेच मृण्मयी देशपांडे.मृण्मयी गेल्या काही वर्षांपासून मुंबई सोडून महाबळेश्वरमध्ये तिच्या नवऱ्याबरोबर राहते. या जोडप्याने निसर्गाच्या सानिध्यात महाबळेश्वरमध्ये सुंदर असं घर बांधलं आहे. याच ठिकाणी दोघांनी 'नील अँड मोमो फार्म' सुरू केलं आहे. मृण्मयीचा नवरा स्वप्निल याठिकाणी शेतीविषयक वर्कशॉप सुद्धा घेतो.आता हे शेतीविषयक वर्कशॉप घेण्यासाठी मृण्मयी व तिच्या पतीने शेतात एक खास जागा बांधली आहे. याठिकाणी स्वप्निल शेतीविषयक माहिती देणारे वर्ग घेईल.असं म्हणत स्वप्निलने ही संपूर्ण जागा व्हिडीओच्या माध्यमातून चाहत्यांना दाखवली आहे. निसर्गाच्या सानिध्यात हे क्लासरूम बांधल्याचं मृण्मयीने तिच्या पोस्टमध्ये लिहिलं आहे.आम्ही जेव्हा हे शेत विकत घेतलं तेव्हा एक गोष्ट नक्की माहिती होती- स्वप्निलला इकडे शिकवायचं आहे.. आणि स्वप्निलने इकडे वर्कशॉप घ्यायला हवी होती अशी माझीही इच्छा होती. याचं कारण म्हणजे ( आणि हे मी तो माझा नवरा आहे म्हणून बोलत नाहीये) जेव्हा-जेव्हा तो शिकवायला उभा राहतो – तेव्हा तेव्हा मी नव्याने त्याच्या प्रेमात पडलेली असते.. त्याला स्वतःला नवीन गोष्टी शिकायला प्रचंड आवडतात, ज्ञान मिळवायला आवडतं... आणि एकमेकांबरोबर SHARE करण्यासाठी एकत्र येणं याहून दुसरं सुख नाही..आम्हाला ही जागा अशी बनवायची आहे... जिथे जगभरातले विद्वान, कलाकार, विचारवंत एकत्र येतील... एकमेकांबरोबर, एकमेकांकडून नवीन गोष्टी शिकतील.. जिथे विचारांची देवाण-घेवाण होईल.. आणि त्यातून काहीतरी अप्रतिम जन्माला येईल...

# 'मैं हूँ ना' साठी सुश्मिता नव्हती पहिली पसंती



बॉलिवूडमधील गाजलेला चित्रपट MAIN HOON NA आजही प्रेक्षकांच्या मनात खास स्थान राखून आहे. शाहरुख खान आणि सुश्मिता सेन यांची ऑनस्क्रीन केमिस्ट्री, गाणी आणि कॉलेजचा माहोल यामुळे हा चित्रपट सुपरहिट ठरला होता. मात्र, या चित्रपटात सुश्मिता सेन ही पहिली पसंती नव्हती, असा खुलासा दिग्दर्शिका फराह खान यांनी केला आहे.'मैं हूँ ना'मध्ये शाहरुख खानने मेजर राम प्रसाद शर्मा ही भूमिका साकारली होती, जो एका कॉलेजमध्ये विद्यार्थी बनून जातो. त्याच कॉलेजमध्ये सुश्मिता सेन चांदनी या शिक्षिकेच्या भूमिकेत दिसली होती. तिचा साडीतील लूक आणि स्टाईल खूप गाजली होती. पण फराह खानच्या मते, सुरुवातीला या भूमिकेसाठी दुसऱ्या अभिनेत्रीचा विचार करण्यात आला होता.फराह खानने तिच्या यूट्यूब चॅनेलवरील एका व्हिडिओमध्ये हा खुलासा केला. तिने सांगितले की, या भूमिकेसाठी पहिली पसंती होती दाक्षिणात्य अभिनेत्री समीरा रेड्डी. फराह म्हणाली की, "मी तुझं 'एशिता किजीये बातें' हे गाणं पाहिलं होतं आणि तुला भारतीय पोशाखात पाहिलं होतं. त्या वेळी मला वाटलं होतं की तू या भूमिकेसाठी योग्य आहेस."हे ऐकून समीरा रेड्डीही आश्चर्यचकित झाली. तिने फराहला विचारलं, "मग माझी निवड का झाली नाही?" यावर फराह खानने सांगितले की, त्या काळात समीराची निवड 'MAINE DIL TUJHKO DIYA' या चित्रपटासाठी झाली होती.

# अजिंक्य भारताचा दबदबा! नेदरलँड्सवर दणदणीत विजय

## दुबे-पंड्याची भागीदारी निर्णायक; चक्रवर्तीने पाठलागावर लावला लगाम

**महाईन्यूज । दिल्ली**

**नेदरलँड्सविरूद्ध आवश्यक सराव करत भारतीय संघाने टी२० वर्ल्डकपच्या शेवटच्या गटवार लढतीतही विजय साकारला. अर्धशतकवीर शिवम दुबे या विजयाचा शिल्पकार ठरला. मात्र याही लढतीत भारतीय संघाचे काही कच्चे दुवे उघड झाले.**







भारताने दिलेल्या १९४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना नेदरलँड्सने सावध सुरूवात केली. पण जगातील नंबर वन गोलंदाज असलेल्या वरूण चक्रवर्तीने येताच संघाला ब्रेकथ्रू मिळवून दिला. मायकेल लेविटने २४ धावा, तर मॅक्स ओडाऊडने २० धावा केल्या. बास डे लीडे यांनी ३३ धावा व कॉलीन एकरमन २३ धावांचं योगदान दिलं. तर स्कॉट एडवर्ड्सने १५ धावा केल्या.

भारताने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. टीम इंडियाचा दक्षिण आफ्रिकेविरूद्धचा सुपर-८ सामना याच मैदानावर होणार असल्याने टीम इंडियासाठी हा सराव सामना होता. टीम इंडियाची फलंदाजीला सुरूवात फारशी चांगली झाली नाही. अभिषेक शर्मा सलग तिसऱ्यांदा शून्यावर बाद होत माघी परतला. तर इशान किशनदेखील विचित्र पद्धतीने बाद झाला. आर्यन दत्तचा चेंडू त्याच्या पॅडला लागून मागे पडला आणि विकेटवर आदळला. यासह आर्यन दत्तने भारताच्या दोन्ही सलामीवीरांना पॉवरप्लेमध्ये माघारी धाडलं.

सूर्या व तिलक यांनी संघाचा डाव सावरला, पण हे दोघेही अनुक्रमे ३४ व ३१ धावा करत बाद झाले. यानंतर शिवम दुबे व हार्दिक पंड्या यांनी ७४ धावांची भागीदारी केली. शिवम दुबेने षटकारांची आतिषबाजी करत महत्त्वाची खेळी केली. शिवम दुबेने ३१ चेंडूत ४ चौकार व ६ षटकारांसह ६६ धावा केल्या. तर हार्दिकने २१ चेंडूत ३ षटकारांसह ३० धावा केल्या. तर रिंकूने अखेरच्या षटकात एक षटकार खेचला. यासह भारतान १९३ धावा केल्या.

### दुबेचा तडाखा, चक्रवर्तीचा वार

शेवटच्या गटवार सामन्यात भारताने १९३ धावांचा भक्कम डोंगर उभा केला. शिवम दुबेने ३१ चेंडूत ६६ धावांची तुफानी खेळी करत विजयाचा पाया रचला, तर हार्दिक पंड्यानेही साथ दिली. प्रत्युत्तरात नेदरलँड्सची सुरुवात सावध झाली असली तरी वरूण चक्रवर्तीने ब्रेकथ्रू देत सामना भारताच्या बाजूने झुकवला. लेविट (२४), ओडाऊड (२०), डे लीडे (३३) व एकरमन (२३) यांच्या प्रयत्नांनंतरही भारतीय गोलंदाजीसमोर नेदरलँड्सचा डाव कोलमडला आणि भारताने सरावासारख्या या लढतीत दणदणीत विजय नोंदवला.

## अमेरिकेचा प्रवास थांबला; सुपर-८ मध्ये भारत-पाक भिडणार

**महाईन्यूज । दिल्ली**

**आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेतील सुपर ८ फेरीत प्रवेश करणारे ८ संघ ठरले आहेत. स्पर्धेतील ३५ वा सामना पाकिस्तान आणि नामिबिया या दोन्ही संघांमध्ये पार पडला. नामिबियाचा संघ आधीच स्पर्धेतून बाहेर पडला होता. तर पाकिस्तानने टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेतील सुपर ८ मध्ये प्रवेश करण्यासाठी हा सामना जिंकणं महत्वाचं होतं. या सामन्यात पाकिस्तानने पहिल्या डावात फलंदाजी करताना १९९ धावांचा डोंगर उभारला. २०० धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या नामिबियाचा डाव अवघ्या ९७ धावांवर आटोपला. यासह पाकिस्तानने हा सामना १०२ धावांनी आपल्या नावावर केला.**

या सामन्यात पाकिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पाकिस्तानकडून सलामीला आलेला सईम अयुब अवघ्या १४ धावा करत माघारी परतला. तर कर्णधार सलमान अली आघाने २३ चेंडूत ३८ धावांची खेळी केली. ख्वाजा नफाय ५ चेंडूत ५ धावा करून माघारी परतला. शेवटी शादाब खान आणि सलामीला आलेल्या साहिबजादा फरहानने महत्वपूर्ण भागीदारी केली आणि संघाची धावसंख्या १९९ धावांवर पोहोचवली. साहिहबजादा फरहानने ५८ चेंडूत ११ चौकार आणि ४ षटकारांच्या साहाय्याने १०० धावांची खेळी केली. तर शादाब खानने २२ चेंडूत १ चौकार आणि ३ षटकारांच्या साहाय्याने ३६ धावांची खेळी केली.




नामिबियाला हा सामना जिंकण्यासाठी २०० धावांचा डोंगर सर करायचा होता. या धावांचा पाठलाग करताना सलामीला आलेल्या लॉरेन स्टीनकॅम्पने २३ धावांची खेळी केली. तर इतर कुठल्याही फलंदाजाला मोठी खेळी करता आली नाही. नामिबियाचा डाव अवघ्या ९७ धावांवर आटोपला.

धावांचा बचाव करताना उस्मान तारिकने ३.३ षटकात १ निर्धाव षटक टाकत सर्वाधिक ४ गडी बाद केले. तर शादाब खानने ४ षटकात १९ धावा खर्च करून ३ गडी बाद केले. तर सलमान मिर्झा आणि मोहम्मद नवाझने प्रत्येकी १-१ गडी बाद केला. या विजयासह ग्रुप ए मधून भारत आणि पाकिस्तान हे दोन्ही संघ सुपर ८ साठी पात्र ठरले आहेत. तर अमेरिका आणि नेदरलँड्सचा संघ स्पर्धेतून बाहेर पडला आहे.

epaper.mahaenews.com

# महाईन्यूज

ePaper

। गुरुवार ।

दि. 19 फेब्रुवारी 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# 'माझी वसुंधरा' अभियानात पिंपरी-चिंचवड राज्यात प्रथम

## 'भूमी' विषयांतर्गतही महापालिकेची उत्कृष्ट कामगिरी

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व हवामान बदल विभाग मार्फत राबविण्यात आलेल्या 'माझी वसुंधरा अभियान ५.०' च्या राज्यस्तरीय अंतिम निकालात १० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या गटात पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने प्रथम क्रमांक पटकावून राज्यात अव्वल स्थान मिळविले आहे. तसेच 'भूमी' विषयांतर्गतही महापालिकेने उत्कृष्ट कामगिरीची नोंद केली आहे.**




अभियानाच्या कालावधीत स्थानिक स्वराज्य संस्थांकडून राबविण्यात आलेल्या विविध पर्यावरणपूरक उपक्रमांचे डेस्कटॉप तसेच फिल्ड मूल्यांकन करण्यात आले. या दोन्ही मूल्यांकनांमधील एकूण गुणांच्या आधारे राज्यातील १४ गटांतील विजेत्यांची निवड शासन मान्यतेनंतर जाहीर करण्यात आली. या संपूर्ण प्रक्रियेत पर्यावरण संरक्षण, हरित उपक्रम, घनकचरा व्यवस्थापन, जलसंवर्धन, ऊर्जा बचत आणि जनजागृती या क्षेत्रांमध्ये प्रभावी व सातत्यपूर्ण कामगिरी करत पिंपरी चिंचवड महापालिकेने प्रथम क्रमांक मिळविला.

महापालिकेने शहरात व्यापक वृक्षारोपण व संवर्धन मोहिमा, प्लास्टिक निर्मूलन उपक्रम, जलसंधारण प्रकल्प, घनकचरा व्यवस्थापनातील सुधारणा, हरित शाळा संकल्पना, सौरऊर्जा प्रकल्प तसेच नागरिकांच्या सक्रिय सहभागातून विविध पर्यावरणपूरक अभियान यशस्वीपणे राबविले. नागरिक, स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक संस्था आणि औद्योगिक आस्थापनांच्या सहकार्यामुळे या अभियानाला व्यापक यश प्राप्त झाले.

या यशाबद्दल महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, आयुक्त श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे तसेच उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी सर्व अधिकारी, कर्मचारी व नागरिकांचे अभिनंदन केले. राज्यस्तरावर मिळालेल्या या मानांकनामुळे पिंपरी चिंचवड शहराची पर्यावरणपूरक शहर म्हणून ओळख अधिक दृढ झाली आहे.

आगामी काळात 'माझी वसुंधरा ६.०' अभियान अधिक व्यापक स्वरूपात राबवून हरित, स्वच्छ आणि शाश्वत शहर उभारण्याचा महापालिकेचा संकल्प आहे.

> माझी वसुंधरा ५.०' अभियानात मिळालेले यश हे संपूर्ण पिंपरी चिंचवड शहराचे आहे. पर्यावरण संवर्धनासाठी शहर कटिबद्ध असून भविष्यातही अधिक प्रभावी आणि तंत्रज्ञानाधारित उपक्रम राबविण्यात येतील. नवकल्पना आणि शाश्वत उपाययोजनांच्या माध्यमातून पर्यावरणपूरक विकासाला अधिक चालना दिली जाईल.
>
> - श्रावण हर्डीकर, आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

> माझी वसुंधरा ५.०' अभियानामध्ये मिळालेला प्रथम क्रमांक हा महापालिकेच्या सर्व विभागांच्या समन्वयित कार्यपद्धतीचा आणि नागरिकांच्या सक्रिय सहभागाचा परिणाम आहे. पर्यावरण संरक्षण, शाश्वत विकास आणि हरित उपक्रमांना प्राधान्य देत आम्ही आगामी काळात अधिक तांत्रिकदृष्ट्या सक्षम व परिणामकारक प्रकल्प राबविणार आहोत. 'माझी वसुंधरा ६.०' अंतर्गत अधिक व्यापक नियोजन करून पिंपरी चिंचवड शहराला पर्यावरणपूरक आणि शाश्वत विकासाच्या दिशेने पुढे नेण्याचा आमचा निर्धार आहे.
>
> - रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महापालिका



# महापौर रवि लांडगे यांचा वैद्यकीय क्षेत्रातर्फे सन्मान

## केमिस्ट व्यावसायिकांकडून 'माझा फार्मासिस्ट, माझा अभिमान' गौरवचिन्ह प्रदान

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमातून केमिस्ट व्यावसायिकांच्या अडचणी सोडविण्यासाठी, नियमावली सुलभ करण्यासाठी आणि आरोग्य व्यवस्थेला अधिक सक्षम करण्यासाठी सकारात्मक निर्णय घेण्याचा माझा प्रयत्न राहील. शहराच्या सर्वांगीण विकासात आरोग्य क्षेत्राला प्राधान्य देत, प्रशासन आणि व्यावसायिक यांच्यात समन्वय वाढविण्यावर भर देण्यात येईल.**



पिंपरी चिंचवड केमिस्ट असोसिएशनतर्फे 'माझा फार्मासिस्ट, माझा अभिमान' या गौरवचिन्हाने केलेला सन्मान माझ्यासाठी अत्यंत भावनिक आणि प्रेरणादायी आहे. मी स्वतः फार्मासिस्ट असल्यामुळे आरोग्यसेवेच्या क्षेत्रातील जबाबदाऱ्या आणि आव्हाने जवळून अनुभवलेली आहेत. समाजाच्या आरोग्य सुरक्षेत केमिस्ट बंधू-भगिनींची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. हा सन्मान माझा नसून संपूर्ण केमिस्ट समुदायाचा आहे. आपण दाखवलेला विश्वास आणि प्रेम हेच माझ्या कार्याची खरी प्रेरणा आहे. अशी भावना महापौर रवि लांडगे यांनी व्यक्त केली.

नुकत्याच पार पडलेल्या महानगरपालिका निवडणुकीत महापौरपदी निवड झाल्याबद्दल नवनिर्वाचित महापौर रवि लांडगे यांचा पिंपरी चिंचवड केमिस्ट असोसिएशनतर्फे सन्मान करण्यात आला. पिंपरी चिंचवड महानगरपालिका भवनातील महापौर कक्षात केमिस्ट असोसिएशनतर्फे महापौर रवि लांडगे यांचा "माझा फार्मासिस्ट, माझा अभिमान" या गौरवचिन्हाने सन्मान करण्यात आला.यावेळी आपल्या भावना व्यक्त करतांना महापौर रवि लांडगे बोलत होते.

या प्रसंगी पुणे जिल्हा केमिस्ट असोसिएशनचे वरिष्ठ उपाध्यक्ष विवेक तापकीर, पीआरओ सचिन धोका, पिंपरी चिंचवड केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष रवी पवार, सचिव चेतन शिंगवी, खजिनदार नंदू पानसरे, भोसरी केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष वसुदेव चव्हाण, संघटक राजेश टोपे, किरण थोरवे, अंकुश परांडे, उमेश देसाई, टाव्हरे, महिला संघटकमोहिनी कोळी, पवन टिंगरे, विशाल टेकाळे, विनोद टोपे तसेच मोठ्या संख्येने केमिस्ट बंधू-भगिनी उपस्थित होते.

फार्मासिस्ट म्हणून कार्यरत असलेल्या महापौर लांडगे यांच्या निवडीमुळे पिंपरी चिंचवडमधील औषध विक्रेते व केमिस्ट बंधू-भगिनींमध्ये आनंदाचे वातावरण असून, हा क्षण केमिस्ट क्षेत्रासाठी अभिमानास्पद असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# अतिक्रमणमुक्त पदपथांसाठी उपमहापौर शर्मिला बाबर आग्रही!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**शहरातील पदपथांवरील वाढत्या अतिक्रमणाच्या पार्श्वभूमीवर उपमहापौर शर्मिला बाबर यांनी कडक भूमिका घेत अतिक्रमणमुक्त, सुरक्षित आणि मोकळे पदपथ सुनिश्चित करण्यासाठी प्रशासनाला ठोस निर्देश दिले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकाच्या शहरी दळण-वळण विभागात आज आयोजित बैठकीत विविध महत्त्वपूर्ण विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.**



> "पिंपरी-चिंचवड शहरातील प्रत्येक नागरिकाला सुरक्षित, स्वच्छ आणि अतिक्रमणमुक्त पदपथ मिळणे हा त्यांचा मूलभूत हक्क आहे. हा हक्क अबाधित ठेवण्यासाठी महापालिका प्रशासनासोबत समन्वय साधून ठोस आणि परिणामकारक कार्यवाही केली जाईल. त्याचबरोबर, लहान व्यावसायिकांनाही नियमानुसार योग्य जागा उपलब्ध करून देत समतोल विकास साधण्यास आम्ही कटिबद्ध आहोत."
>
> -शर्मिला बाबर, उपमहापौर, पिंपरी-चिंचवड, पुणे.

या बैठकीस प्रभाग क्रमांक १५ मधील नगरसेविका शैलजा मोरे, राजू मिसाळ, अमित गावडे, शहर अभियंता मकरंद निकम, कार्यकारी अभियंता चंद्रकांत मुठाळ ('ब' प्रभाग स्थापत्य), सुनील पवार तसेच उपआयुक्त सीताराम बहुरे यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी व स्थानिक प्रतिनिधी उपस्थित होते. शहर विकासासंदर्भातील विविध प्रलंबित व महत्त्वाच्या विषयांवर ही बैठक बोलावण्यात आली होती. नागरिकांच्या दैनंदिन अडचणी, वाहतूक व्यवस्थापन, पादचारी सुविधा आणि व्यावसायिकांचे प्रश्न यावर व्यापक चर्चा करण्यात आली.

बैठकीत हरित सेतू प्रकल्पाच्या नियोजन प्रक्रियेपासून ते अंमलबजावणीपर्यंतच्या प्रत्येक टप्प्याचा सखोल आढावा घेण्यात आला. प्रकल्पासाठी मंजूर निधी, कामाचा दर्जा, वेळापत्रक, कंत्राटदारांची जबाबदारी तसेच प्रगती अहवाल याबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेण्यात आली. प्रकल्प ठरलेल्या कालमर्यादेत पूर्ण व्हावा आणि कोणतीही तांत्रिक त्रुटी राहू नये यासाठी आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या. हरित सेतू प्रकल्पामुळे पर्यावरणपूरक विकासाला चालना मिळेल आणि वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

तसेच शहरातील हॉकर्स झोन निश्चितीच्या विषयावर सविस्तर व सकारात्मक विचारविनिमय झाला. अनधिकृत फेरीवाले, पदपथावरील अतिक्रमणे आणि त्यातून निर्माण होणाऱ्या वाहतूक व सुरक्षेच्या समस्या यांचा आढावा घेण्यात आला. हॉकर्स झोनसाठी नियमानुसार, न्याय्य व पारदर्शक पद्धतीने जागा निश्चित करून छोट्या व्यावसायिकांना स्थिर पर्याय उपलब्ध करून देण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. वाढत्या वाहनसंख्येमुळे निर्माण झालेल्या पार्किंग समस्येवरही प्रभावी व दीर्घकालीन उपाययोजना राबविण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली. मल्टिलेव्हल पार्किंग, नामांकित पार्किंग झोन आणि शिस्तबद्ध वाहतूक नियोजन यावर भर देण्यात आला.

हॉकर्स झोनसाठी लवकरात लवकर योग्य जागा निश्चित करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, तसेच पदपथ पूर्णपणे अडथळामुक्त ठेवण्यासाठी नियमित मोहिमा राबवाव्यात, अशा स्पष्ट सूचना उपमहापौर बाबर यांनी प्रशासनाला दिल्या. नागरिकांच्या सुरक्षिततेशी तडजोड न करता संतुलित निर्णय घेणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

उपमहापौर शर्मिला बाबर म्हणाल्या, "पदपथ हे पादचाऱ्यांचे मूलभूत हक्काचे साधन आहे. ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, महिला आणि दिव्यांग बांधवांसाठी सुरक्षित व अडथळामुक्त पदपथ अत्यावश्यक आहेत. नागरिकांच्या सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही. त्याचवेळी छोट्या व्यावसायिकांनाही न्याय मिळावा आणि त्यांच्या उपजीविकेचा प्रश्न मार्गी लागावा यासाठी नियोजनबद्ध व कायदेशीर उपाययोजना राबविणे आवश्यक आहे." नागरिकांना सुरक्षित व अडथळामुक्त सुविधा उपलब्ध करून देत विक्रेत्यांना नियमानुसार जागा देण्यासाठी प्रशासनाशी सातत्यपूर्ण समन्वय ठेवून ठोस पावले उचलली जातील, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.




# Matru Pitru Pujan Diwas Celebrated on 14th February 2026, at RKL Galaxy

**MAHAENEWS I PUNE**

**While the entire nation was celebrating Valentine's Day on 14/02/2026, RKL Galaxy International School marked the occasion in a unique and culturally enriching manner by observing Matru Pitru Pujan Diwas with great devotion and enthusiasm.**






This noble initiative was started in the year 2014 by the visionary leader and CEO, Dr. Pushkar Choubey. Under his inspiring guidance, the school has consistently upheld this beautiful tradition every year, encouraging students to honor and express gratitude towards their parents.

The celebration was organized class-wise, with parents invited to attend the special program. The event began with cultural performances by students, including melodious songs and vibrant dances dedicated to their parents as a token of love and respect. The atmosphere was filled with emotion as children expressed heartfelt gratitude towards their first teachers and lifelong supporters—their parents.

A particularly touching moment came when students performed the traditional ritual of worshipping their parents. They offered flowers, applied tilak on their parents' foreheads, performed aarti, and sought their blessings. The ceremony reflected deep-rooted Indian values and traditions, reinforcing the importance of respecting and honoring one's parents.

An interesting highlight of the event was when parents were asked, "What day is today?" Many responded, "Valentine's Day." However, the young students of the pre-primary section proudly answered, "Matru Pitru Pujan Diwas." This response beautifully reflected the vision of Dr. Choubey Sir, who aims to instill cultural awareness and traditional values in students from an early age, encouraging them to embrace Indian heritage over western influences.

On this special occasion, parents were also encouraged to return home and pay respect to their own parents, reinforcing the message that parents are our first love and deserve reverence and gratitude every day.

The celebration concluded on an emotional and joyful note, leaving parents overwhelmed and proud. Through such meaningful initiatives, RKL Galaxy International School continues to nurture not only academic excellence but also strong moral and cultural values among its students.

The school reaffirmed its commitment to continue celebrating Matru Pitru Pujan Diwas every year, keeping alive the spirit of respect, gratitude, and Indian tradition for generations to come.

RKL GALAXY IGNITING A BRIGHTER FUTURE ™
RKL GALAXY International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution

www.rklgis.org

RKL GALAXY International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution

# TEACHERS' HIRING

**WALK-IN INTERVIEW**

Hiring teachers for all subjects across Pre-Primary, Primary, and Secondary sections for the academic year 2026–27.

## Walk-In Schedule Timings:

**Saturday, 21st February 2026**
**Timing: 11:00 AM to 4:00 PM**

**Monday to Friday**
**Timing: 2:00 PM to 4:30 PM**

## Venue:

RKL Galaxy International School, Sr. No. 149/5, Opp. Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune – 412105

www.rklgis.org 8698360005

